# राष्ट्रीय लोकअदालत पॅनल प्रमुख क्र.५, अंबड यांचे न्यायालयात

सं.फौ.खटला क्र.३२३/२०२५
नि.क्र.

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याची तारीख | :- | १५/०५/२०२५. |
| २. अहवालाचा / फिर्यादीची तारीख | :- | १५/०५/२०२५. |
| ३. फिर्यादीचे नांव, वय व त्याचे पद | :- | इब्राहीम मोलना शेख, वय ५७ वर्ष, नोकरी, पोलीय उपनिरीक्षक, पोलीस ठाणे गोंदी |
| ४. आरोपीचे नांव, वय व पत्ता | :- | अय्युब पाशामिया शेख, वय ४६ वर्ष रा. वाळकेश्वर शहागड, ता.अंबड जि.जालना. |
| ५. अपराधाचे कलम | :- | भा.न्या.सं. कलम २८५ अन्वये शिक्षापात्र. |

६. आरोपीचे प्रतिकथन :- तुम्ही दि.१५/०५/२०२५ रोजी १६.०० वा.च्या सुमारास शहागड येथील एस.टी. बस स्टॅंड समोर उड्डाणपूलाच्या खाली सार्वजनिक ठिकाणी आपले ताब्यातील तिन चाकी रिक्शा क्र.एम. एच. २१ एम. ३०५३ हे वाहन रस्त्यामध्ये असुरक्षीतरित्या लावून सार्वजनिक रहदारीस अडथळा निर्माण करुन अपघात होऊन लोंकाच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने अवाजवी काळासाठी उभी करून तुम्ही भा.न्या.सं.चे कलम २८५ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

प्रश्न-१. तुम्हाला तुमचे विरुध्द दाखल झालेल्या खटल्याचे कागदपत्र मिळाले काय?

उत्तर. होय.

प्रश्न-२. तुम्हाला तुमचेवर ठेवण्यात आलेला अपराध वाचुन दाखविला तो तुम्हास समजला काय?

उत्तर. होय.

प्रश्न-३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?

उत्तर. मला गुन्हा कबुल आहे .

दिनांक:-०९/०५/२०२६.

समक्ष,

स्वा/-

--------------

आरोपीची सही

( **एस. एस. परिहार**)
लोकअदालत पॅनल प्रमुख क्र.५, अंबड
अंबड .

आरोपी हे आज न्यायालयापुढे हजर असून आरोपीने त्यांचे विरुध्द नोंदविण्यात आलेला गुन्हा स्वेच्छेने कबूल केलेला आहे. आरोपीने सदरचा गुन्हा स्वेच्छेने कबूल केल्यानंतर त्याबाबत होणारी शिक्षेबाबत त्यांना स्पष्टीकरण विचारले असता त्याने निवेदन केले की त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असून ते कसेबसे मजुरीचे काम करुन स्वतःचे चरिताथ चालवितात. आरोपी हेच त्यांचे कुटूंबातील कमविता असून आरोपीच्या कुटूंबातील लोक आरोपीवर व आरोपीच्या कमाईवर अवलंबून आहेत- त्यामुळे आरोपीने कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली- विदवान सरकारी वकिल यांनी युक्तीवाद केला की गुन्हयाचे स्वरुप व आरोपीचे निवेदन लक्षात घेता योग्य तो आदेश पारीत करावा- आरोपीविरुध्दच्या गुन्हयाचे स्वरुप त्यांनी मांडलेले म्हणणे विचारात घेवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे-

**आदेश**

आरोपी -**अय्यूब पाशामिया शेख** यांना भा.न्या.सं. चे कलम २८५ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयांतून भा.ना.सु.सं., कलम २७५ अन्वये दोषी धरण्यात येत आहे व त्यांना सदर गुन्ह्यासाठी रक्कम रुपये ३००/- (अक्षरी रुपये तिनशे मात्र) दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास दोन दिवसांच्या साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

स्वा/-
( **एस. एस. परिहार**)
लोकअदालत पॅनल प्रमुख क्र.५, अंबड
अंबड .

दिनांक ०९/०५/२०२६
अंबड